दै. पुण्यनगरी दि. 18.10.25

# तीन दुचाकींसह चार चोरटे ताब्यात



**नांदेड :** शहर व परिसरात दुचाकी चोरणाऱ्या टोळीच्या मागावर असताना चार चोरटे पोलिसांच्या हाती लागले. त्यांच्याकडून ७० हजारांच्या ३ चोरलेल्या दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

पालम तालुक्यातील गणेशवाडीचे रहिवासी महेश बलोरे, राजकुमार गंडवे (रा.सोमेश कॉलनी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दुचाकी चोरीचा गुन्हा वजिराबाद व भाग्यनगर पोलिस ठाण्यात दाखल झाला होता. परंतु या दुचाकींचा शोध लागला नव्हता. भाग्यनगर पोलिस व स्थानिक गुन्हे शाखा पथकाने संयुक्त मोहीम आखली होती. एका टोळीतील काही जण आसना पुलाजवळ दोन दुचाकीवर थांबल्याची माहिती पथकाला मिळाली. या माहितीची खातरजमा करत पथकाने घटनास्थळी जाऊन दोन दुचाकं वरील चौघांना रोखले आणि त्यांना दुचाकींची कागदपत्रांबाबत विचारणा केली. चोरट्यांनी त्यांना उडवाउडवीची उत्तरे दिल्याने पोलिसांचा संशय बळावला. या पथकाने चारही जणांना ताब्यात घेत चौकशी केली असता त्यांनी आम्ही ३ दुचाकी चोरल्या असल्याची कबुली दिली. या टोळीतील एक जण सज्ञान व अन्य तिघे जण अल्पवयीन आहेत. चोरीच्या ३ दुचाकी पोलिसांनी जप्त केल्या आहेत. गणेश उर्फ चुहा बालाजी हिंगोले (१९, रा.देगाव चाळ) व अन्य ३ अल्पवयीन बालक अशा चौघांना अटक केली आहे.